वाचले :- महाराष्ट्र शासन निर्णय क्रमांक: संकिर्ण २०१७/प्र.क्र.४४/आरोग्य ३, दि. ०४.०४.२०१९.

क्र. ४८८/१८

जिल्हाधिकारी वाशिम यांचे कार्यालय,

वाशिम.

दि. ४/०८/२०१८

आदेश,

जैव वैद्यकीय कचरा अधिनियिम २०१६ मधील नियम ११ (११) नुसार अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव, राज्य स्तरीय सल्लागार समितीची स्थापना करण्यास संदर्भ क्र. १ या शासन निर्णयानुसार मान्यता देण्यात आली. जैव वैद्यकीय कचरा अधिनियिम २०१६ अंतर्गत नियमांची योग्यरीत्या अंमलबजावणी केली जाते अथवा नाही यावर देखरेख ठेवणे, सदर अधिनियम अंतर्गत सल्ला देण्याचे तसेच सदर अधिनियमात सुधारणा झाल्यास त्याबाबत सल्ला देण्याचे काम राज्य स्तरीय सल्लागार समितीचे आहेत. राज्य स्तरीय सल्लागार समिती प्रमाणेच जिल्हा स्तरावर जिल्हा स्तरीय सल्लागार समिती कामकाज पाहील असे सदर शासन निर्णयामध्ये नमुद करण्यात आले आहे.

त्यानुसार जैव वैद्यकीय कचरा अधिनियिम २०१६ अंतर्गत जिल्हा स्तरावर कामकाज पाहण्यासाठी, वाशिम जिल्हयाकरीता, जिल्हा स्तरीय सल्लागार समिती खालीलप्रमाणे करण्यात येत आहे.

| अ.क्र. | अध्यक्ष/सदस्यांचे नांव | पद |
|---|---|---|
| १ | मा. जिल्हाधिकारी वाशिम | अध्यक्ष |
| २ | जिल्हा शल्य चिकित्सक | सदस्य |
| ३ | जिल्हा आरोग्य अधिकारी | सदस्य |
| ४ | मुख्याधिकारी नगरपरिषद | सदस्य |
| ५ | आरोग्य अधिकारी नगरपरिषद | सदस्य |
| ६ | प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि. मंडळ अमरावती | सदस्य सचिव |
| ७ | डॉ. हरीष बाहेती, प्रतिनिधी, इंडीयन मेडीकल असोसीएशन वाशिम | सदस्य |

**समितीची कार्यकक्षा :-**

१) जैव वैद्यकीय कचरा अधिनियम, २०१६ नियमांची जिल्हास्तरावर योग्यरित्या अंमलबजावणी केली जाते अथवा नाही यावर देखरेख ठेवणे.

२) समितीची त्रैमासिक बैठक घेणे.

३) मुंबई नर्सिग होम रजिस्ट्रेशन ॲक्ट-१९४९ च्या अंमलबजावणीचा आढावा घेणे.

४) खाजगी व शासकीय रूग्णालयाचा जैविक वैद्यकीय कचरा (BMW) नोंदणीबाबत आढावा घेणे.

५) रूग्णालयात किती जैविक वैद्यक कचरा निर्माण होतो व त्याची विल्हेवाट कशी लावली जाते याबाबत आढावा घेणे.

६) जैविक वैद्यक कचरा विल्हेवाट लावण्यासाठी Common Treatment & Disposal Facility याचा आढावा घेणे.

७) जैविक वैद्यक कचरा बाबत शासकीय व खाजगी रूग्णालयांच्या अडीअडचणी जाणून घेणे.

८) जैविक वैद्यक कच-याच्या साठवणूक व विल्हेवाट यासाठी परिणामकारक उपाययोजनांबाबत उपाय सुचविणे व अंमलबजावणी करणे.

९) क्षेत्रिय भेटी देवून पाहणी करणे.

जिल्हाधिकारी वाशिम

प्रत,

१. मा. जिल्हाधिकारी वाशिम.
२. जिल्हा शल्य चिकित्स.
३. जिल्हा आरोग्य अधिकारी.
४. मुख्याधिकारी नगरपरिषद.
५. आरोग्य अधिकारी नगरपरिषद
६. प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि. मंडळ अमरावती.
७. डॉ. हरीष बाहेती, प्रतिनिधी, इंडीयन मेडीकल असोसीएशन वाशिम.

जिल्हाधिकारी वाशिम